# श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना

उद्देश्य -६५ व ६५ वर्षावरील निराधार, वृध्द स्त्री व पुरुषांना अर्थसहाय्य करण्याच्या हेतुने कार्यान्वित करण्यात आली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | पात्रता | :- | १) वय - ६५ व ६५ वर्षावरील असावे.<br>२) उत्पन्न- प्रतिवर्षी रुपये २१,०००/- पर्यंत असावे किंवा कुटुंबाचे नांव ग्रामीण / शहरी भागाच्या दारिद्रयरेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे<br>३) किमान १५ वर्षापासून महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. |
| २) | आवश्यक कागदपत्रे | | **१) वयाचा दाखला:** १) ग्रामपंचायतीच्या/नगरपालिकेच्या/महानगरपालिकेच्या जन्मनोंद वहीतील उताऱ्याची साक्षांकित प्रत किंवा शाळा सोडल्याचा दाखला. किंवा २) शिक्षापत्रिकेमध्ये अथवा निवडणूक मतदार यादीत नमूद केलेल्या वयाचा उतारा. किंवा ३) ग्रामीण/नागरी रुग्णालयाच्या वैद्यकिय अधिक्षक यांचा किंवा त्यापेक्षा वरील दर्जाच्या शासकीय वैद्यकिय अधिकाऱ्याने दिलेला वयाचा दाखला.<br>**२)उत्पन्नाचा दाखला:** १) तहसिलदार किंवा उप विभागीय अधिकारी यांनी दिलेला दाखला (अर्जदाकडून रु . ५/- च्या (Court Fee Stamp) वर प्राप्त झालेल्या अर्जानुसार किंवा २) दारिद्रेरेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये त्या व्यक्ती / कुटुंबाचा समावेश असल्याबद्दलचा सांक्षाकित उतारा.<br>**३) रहिवाशी दाखला:** १) ग्रामसेवक / तळाठी / मंडळ निरिक्षक यांनी दिलेला रहिवाशी असल्याबाबतचा दाखला. किंवा २) कोणत्याही न्यायालयाने दिलेला रहिवाशी दाखलाही ग्राहय धरण्यात येईल. |
| ३) | आर्थिक सहाय्य / निवृत्तीवेतन | :- | (अ) दारिद्रयरेषेखालील कुटूंबाच्या यादीतील लाभार्थ्यांना रुपये ४००/- + याच लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेखाली रुपये २००/- प्रतिमहा असे एकुण रुपये ६००/- प्रतिलाभार्थी निवृत्तीवेतन देण्यात येते.<br>(ब) दारिद्रय रेषेखालील कुटूंबाच्या यादीत नाव नसलेल्या व कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये २१,०००/- पर्यंत असलेल्या लाभार्थ्यांना रुपये ६००/- प्रतिलाभार्थी प्रतिमहीना निवृत्तीवेतन देण्यात येते.<br>१) संजय गांधी निराधारा अनुदान योजनेमधील लाभार्थी ६५ वर्षांचे झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांना श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेमध्ये या योजनांच्या निकषांच्या अधिन राहून सामावून घेतले जाईल. |
| ४) | कार्यपध्दती | :- | अर्ज:- अर्जदार → तलाठयांकडे → तलाठी → तहसिलदार/ तहसिलकार्यालय कडे → तहसिलदार अर्ज मंजुरीसाठी संबंधीत उपविभागीय अधिकारी यांचे कडे सादर. |